पुणे महानगरपालिका

**✻ स्थायी समिती ✻**

कार्यपत्रिका क्रमांक ४३

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **शुक्रवार दि.४/१/२००८** रोजी सकाळी ११:३०(साडे अकरा) वाजता **म.ज्योतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. १४५६**

मा. चंद्रकांत मोकाटे, उपमहापौर व मा. अशोक हरणावळ यांचे दि. २०/१२/२००७ चे पत्र.

धायरी कर्णबधीर मुलांची शाळा ही संस्था रजिस्टर असून, सदर संस्थेमार्फत बधिरमुक व्यक्तींसाठी शिक्षण विस्तार योजना तसेच पुनर्वसन शिक्षण केंद्र व पालक मार्गदर्शन केंद्र इत्यादी योजना राबविल्या जातात.

त्यांच्या या शैक्षणिक सामाजिक कार्याची दखल घेऊन या संस्थेला रक्कम रु. १,००,०००/- देणगी मंजूर करण्यात यावी.

**विषय क्र.१४५७**

मा. दिलीप उंबरकर व मा.सौ..ज्योत्स्ना सरदेशपांडे यांचे दि.२४/१२/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ५९ मधील म्हाडा कॉलनी कॉर्नर ते शेपालिका, सुतारदरा येथील अंतर्गत रस्ता साईडपट्टीसह ग्राऊटींग करुन डांबरीकरण करणेसाठी र.रू.३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे, ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-०८ चे अंदाजपत्रक, यादी क्र. ए-९, एकात्मिक रस्ते विकास योजना अंतर्गत करावयाची कामे, पान क्र. २४, अ.क्र. ६ पौड फाटा ते बालभारती पर्यंतचा कलम २०५ चा रस्ता करणे. (एकूण तरतूद द.र.रुपये २ कोटी ७० लाख) | ३० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र. ५९ मधील म्हाडा कॉलनी कॉर्नर ते शेपालिका, सुतारदरा येथील अंतर्गत रस्ता साईडपट्टीसह ग्राऊटींग करुन डांबरीकरण करणे. | --- | ३० लाख |

**विषय क्र.१४५८**

मा. दिपक मानकर, मा. वसंत मोरे, मा. अरुण धिमधिमे, मा. संदीप लडकत, मा. शंकरराव बेलदरे पाटील, मा. आबा बागुल, मा. सौ. कमल व्यवहारे यांचे दि. २४/१२/२००७ चे पत्र.

कोथरुड स.नं. ७९ येथील संपूर्ण जमिनीवर शिल्प, शिलालेख, ऐतिहासिक संदर्भ, स्लाईड शो, या माध्यमाचा वापर करुन पुणे मनपातर्फे सदर ठिकाणी शिवसृष्टी निर्माण करण्यात यावी यासाठी रक्कम रु. ५ कोटी सन २००८-२००९ चे अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी.

**विषय क्र. १४५९**

मा. लक्ष्मण आरडे, मा. संदीप लडकत, व मा. अरुण धिमधिमे,यांचे दि. २४/१२/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ४९ जुना बाजार येथील घरांक २३२ मंगळवार पेठ व २३० मंगळवार पेठ या दोन मिळकतीतून वजन काट्यापासून मरिअमन नगर रोडकडे जाणारा रस्ता हा टी. पी. आखणी प्रमाणे बरोबर आहे. परंतु भूमिप्रापण विभागाने सदर रस्ता प्लॅन मध्ये दर्शविताना घरांक २३२ च्या बाजूने सरकविलेला आहे. तरी सदर रस्ता कलम २१० ब प्रमाणे डी. पी. च्या आखणीप्रमाणे आखण्यात यावा.

**विषय क्र. १४६०**

मा.सुनिल टिंगरे व मा. सौ. मंगला मंत्री यांचे दि. २६/१२/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ३ मधील कलवड, खेसे पार्क येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणेकरिता र.रू.१५,००,०००/- लाखाचे वर्गीकरण खालील प्रमाणे करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-०८ चे अंदाजपत्रक, यादी क्रं डी -३, २-गटारे व नाले, २. मुख्य मलनि:सारणी, मुख्य तपासकुंड, मुख्य मलनि:सारण नलिका मलनि:सारणीसंबंधी कामे करणे,(ड) शहरातील नागझरी नाले सुधारण्यासाठी पान क्र. ५४,अनुक्रमांक १, पुणे नगर रोड रामवाडी पापल सेमिनरी ते हरीनगर पुलापर्यंत नाला चॅनेलायझेशन करणे व इतर तद्नुषंगिक कामे करणे. (मान्य तरतूद रु. ३०,००,०००/-) | १५,००,००० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम वॉर्ड क्र. ३ मधील कलवड, खेसे पार्क येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | १५,००,००० लाख |

**विषय क्र. १४६१**

मा. राजेंद्र काची, मा. दिलीप उंबरकर, मा. अरुण धिमधिमे, मा. महादेव बाबर व मा. सुनिल बनकर यांचे दि. २७/१२/२००७ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेचे महात्मा गांधी उद्यान, बनगार्डन येथील वाहनतळ श्री. गणेश पांडूरंग शिंदे चालवित आहेत. त्याची मुदत मार्च २००८ पर्यंत आहे. तरी पुढील तीन वर्षाचा मक्ता १२% रक्कम वाढवून एक रकमी देण्यात यावा.

**विषय क्र. १४६२**

मा. शंकर उर्फ बंडू केमसे व मा. सौ. सुरेखा उर्फ लीना पानसरे यांचे दि. २७/१२/२००७ चे पत्र.

बावधन येथील टोल नाका मनपा हद्दीबाहेर हलविणेसाठी खालील बाबींस मान्यता देण्यात यावी.

१. पी. डब्लयू डी ने बी. ओ. टी. तत्वावर केलेला पौड रस्ता चांदणी चौक ते म न पा हद्द संपेपर्यंत जेवढा केला असेल त्याचा खर्च मनपा कडून घ्यावा.

२. म.न.पा. हद्दीतील नागरिकांकडून गोळा केला जाणारा टोल मनपाने द्यावा.
(उदा:- १० कोटी मनपा हद्दीतील पुलाकरिता देणार आहेत त्या निकषावर)

३. टोलनाका हद्दीबाहेर नेल्याशिवाय मनपा जे १० कोटी टोल रुपात देणार आहेत ते देऊ नये व देण्याची प्रक्रिया थांबवावी.

४. नागरिकांकडून टोल घ्यावयाचा असेल तर पेट्रोल वरील सेल्सकर, पथकर, नागरिकांच्या टॅक्स मधून माफ करावा.

**विषय क्र. १४६३**

मा.सुनिल बिबवे व मा.अक्रुर कुदळे पाटील यांचे दि. २७/१२/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्रं.१२३ बिबवेवाडी गावठाण या ठिकाणी झाला कॉम्प्लेक्स येथे अंतर्गत रस्ते करणे र.रु.५,००,०००/- तसेच आनंदनगर वसाहत येथे अंतर्गत इंटरब्लॉकिंग बसविणे र.रु.२,००,०००/- असे एकूण र.रु.७,००,०००/- चे वर्गीकरण खालील प्रमाणे करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-०८ चे अंदाजपत्रक, यादी क्रं एस -१९,शहरात विविध ठिकाणी शौचालय बांधणे व दुरुस्ती करणे, पान क्र. ३०८, अनुक्रमांक ४७, | | |
| वॉर्ड क्र. १२३ बिबवेवाडी गावठाण येथे सुलभ शौचालय बांधणे. | ७,००,००० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| १) वॉर्ड क्रं.१२३ बिबवेवाडी गावठाण या ठिकाणी झाला कॉम्प्लेक्स येथे अंतर्गत रस्ते करणे. | --- | ५,००,००० लाख |
| २) वॉर्ड क्र.१२३ आनंदनगर वसाहत येथे अंतर्गत इंटरब्लॉकिंग बसविणे | --- | २,००,००० लाख |

**विषय क्र. १४६४**

मा. सुनिल गोगले व मा. शिवराम मेंगडे यांचे दि. २७/१२/२००७ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. १२२९, दि. ४/१२/०७ चा फेरविचार करुन वर्गीकरणाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

(वॉर्ड क्र. १६ मधील स. न. ९० आदर्श इंदिरानगर येथे इंटरब्लॉक बसविणेकरिता र.रु. ६.५० लाखाचे वर्गीकरणाबाबत.)

**विषय क्र. १४६५**

मा. दिलीप उंबरकर व मा. सुनिल कांबळे यांचे दि. २८/१२/२००७ चे पत्र.

नगरसिचव कार्यालयाकडे टपाल वाटपासाठी ९ सेवक कार्यरत आहेत त्यापैकी फक्त दोन सेवकांना (लुना) अलौन्स द.म.१००० इतका मिळत आहे. तथापी मनपा च्या हद्दीत वाढ झाल्यामुळे वरील टपाल वाटप सेवकांना टपाल वाटप करताना बराच त्रास सहन करावा लागत आहे.

तरी नगरसचिव कार्यालयाकडील सर्व टपाल वाटप सेवकांचे पी.एम.टी.चे मोफत बस पास कार्यालयाकडे जमा करुन त्यांना मनपाच्या नियमाप्रमाणे द.म. १३०० रु. मोटार सायकल अलौन्स देण्यात यावा

**विषय क्र. १४६६**

मा. वसंत मोरे यांचे दि. २८/१२/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्रं.१४१ मधील कात्रज नविन वसाहत येथील विविध गल्ल्यामध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणेकरिता र.रु. १०,००,०००/- चे वर्गीकरण खालील प्रमाणे करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-०८ चे अंदाजपत्रक, १६ उद्याने व प्राणीसंग्रहालये, पान क्र. २७२, अनुक्रमांक १३ | | |
| कात्रज येथे रेल्वे म्युझियम करणे. | | |
| (मान्य तरतूद ३०,००,०००/-) | १०,००,००० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्रं.१४१ मधील कात्रज नविन वसाहत येथील विविध गल्ल्यामध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे. | --- | १०,००,००० लाख |

**विषय क्र. १४६७**

मा. सुनिल बनकर, मा. सौ. अलका खाडे, मा. शंकरराव बेलदरे, मा. महादेव बाबर यांचे दि. २८/१२/२००७ चे पत्र.

पुण्याच्या पुर्वे कडील हडपसर परिसरात , त्या परिसरातील नागरिकांसाठी करमणूकीचे एकही दालन, सांस्कृतिक हॉल उपलब्ध नाही. त्या परिसरातील नागरीकांसाठी जीवन ज्योती हृदय प्रतिष्ठान वतीने हडपसर फेस्टीव्हल या सांस्कृतिक कार्यक्रमाचे दर वर्षी लहान मुले, युवक, महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमाचे पुणे मनपाने सह प्रायोजकत्व स्विकारुन १० लाख रुपये ह्या कार्यक्रमाला देण्यात यावे.

**विषय क्र. १४६८**

मा. अरविंद शिंदे, मा. महादेव बाबर मा. सुनिल बनकर, मा. सौ. रेखा टिंगरे, मा. सुनिल बिबवे, मा.सौ.कमल व्यवहारे, मा. विजय मारटकर, मा. आबा बागुल, मा. अरुण धिमधिमे, मा. शंकरराव बेलदरे, मा. राजेंद्र काची, दिलीप उंबरकर व मा.संदिप लडकत यांचे दि. २८/१२/२००७ चे पत्र.

पुणे शहरामधील लाल महाल येथे जो राजमाता जिजाऊ व बाल शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या शेजारी राजे शहाजी महाराज भोसले यांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्यात यावा.

**विषय क्र. १४६९**

मा.सौ.पार्वती भडके व मा. दत्तात्रय ससाणे यांचे दि. २८/१२/२००७ चे पत्र.

सर्व्हे नं. ४७ घोरपडी पुणे १ या जागेवर उद्यानाचे आरक्षण आहे.तरी जागेचे भूसंपादनाची कार्यवाही त्वरित करण्यात यावी.

**विषय क्र. १४७०**

मा.सौ.पार्वती भडके व मा. दत्तात्रय ससाणे यांचे दि. २८/१२/२००७ चे पत्र.

सर्व्हे नं. ५२,५३ घोरपडी येथील जागेवरून डी.पी. रोड जात आहे. या येथे बेकायदेशिर बांधकाम सुरू झालेली आहेत.

तरी त्वरित अतिक्रमणे काढून तेथे अर्जन्सी क्लॉज लावून त्वरित भूसंपादन करून रस्ता करावा.

**विषय क्र. १४७१**

मा.सौ. सीमा सरदेशपांडे व मा. श्रीमती माधुरी मिसाळ यांचे दि. २८/१२/०७ चे पत्र.

बुधवार पेठ घरांक ६५१ ते ६७२ हा शामसिंग परदेशी व भाऊ रंगारी रस्ता यांना जोडणारा रस्ता कलम २१० (अ) प्रमाणे ३० फुटी करण्यात यावा.

**विषय क्र. १४७२**

मा.सौ.वर्षा तापकीर व मा. सौ. रंजना टिळेकर यांचे दि. २८/१२/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्रं. १३३ स.नं. २६ ज्ञानप्रसारक शाळेपासून जगताप यांच्या घरापर्यत ४ इंच पाण्याची लाईन टाकणेकरिता र.रू. ३,००,०००/- चे वर्गीकरणस खालीलप्रमाणे करण्यात यावे, ही विनंती.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-०८ चे अंदाजपत्रक, यादी क्रं. एस-६ | | |
| शहरात विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व दुरस्ती करणे. | | |
| पान क्रं. ८१ अनुक्रमांक १५१, वॉर्ड क्रं. १३३ आंबेगाव पठार विविध ठिकाणी ड्रेनेजलाईन टाकणे | ३लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्रं. १३३ स.नं. २६ ज्ञान प्रसारक शाळेपासून जगताप यांच्या घरापर्यत ४ इंच पाण्याची लाईन टाकणे | --- | ३लाख |

**विषय क्र. १४७३**

मा.सौ.उज्ज्वला पावटेकर व मा. सौ. सीमा सरदेशपांडे यांचे २८/१२/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्रं.८० मध्ये विरंगुळा केंद्र (महाराणा प्रताप बागेत) बांधणेकरिता र.रू. ५,००,०००/- चे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-०८ चे अंदाजपत्रक, यादी क्रं. एस-३० | | |
| शहरातील वाहतुक व्यवस्था सुधारण्यासाठी विविध विकासाची कामे करणे | | |
| पान क्रं. २९९, अनुक्रमांक ४, वॉर्ड क्रं. ८० महाराणा प्रताप बागेजवळील अलेक्झाडंर ग्रॅहमबेल चौकाचे सुशोभिकरण करणे तसेच वॉर्डातील विविध चौकाची सुधारणा कामे करणे | ५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्रं. ८०.मध्ये महाराणा प्रताप बागेत विरंगुळा केंद्र बांधणे | --- | ५लाख |

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्रं. १४७४**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि.१८/८/२००७ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. १५/१२/२००७ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.प्र.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/३३२ दि.२८/१२/२००७ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. १४७५**

श्री. प्र.ना. तापीकर यांची ग्रंथ छपाई करून घेण्यास सहा महिने मुदतीने करार पद्धतीने नेमुणक करणेसाठी मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्रं.मआ/नस/९५३, दि. २६/१२/२००७ चे पत्र.

## ठरावान्वये आलेले अभिप्राय

**विषय क्र. १४७६**

वॉर्ड क्र. ९० मधील कामे करण्याकरिता र.रु. १२.५० लाखाचे वर्गीकरणाबाबत मा. सौ. चित्रा लोंढे यांचे दि. २०/१०/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठ.क्र. ९७२, दि.३०/१०/२००७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी पत्र क्र. मआ/पापू/प्र/९५६, दि. २६/१२/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्र. १४७७**

वॉर्ड क्र. १३ आगाखान पॅलेसमध्ये विविध ठिकाणी फुटपाथ करणेकरिता र.रु. २० लाखाचे वर्गीकरणाबाबत मा. प्रकाश गलांडे(पाटील) व मा. सुनिल बनकर यांचे दि. ३/१०/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठ.क्र. ८६५, दि.११/१०/२००७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी पत्र क्र. मआ/पथ/९५८, दि. २६/१२/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्र. १४७८**

प्रभाग क्र. १६, सर्व्हे नं. ७५, ७६ हडपसर रेल्वे लाईन कडेने रस्ता  व पूल करणे या कामाचे र.रु.४५ लाखाचे वर्गीकरणाबाबत मा.सौ. चित्रा लोंढे यांचे दि.२०/१०/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठ.क्र. ९७३, दि.३०/१०/२००७ ला अनुसरुन मा. अति. महा. आयुक्त (वि) यांनी पत्र क्र.मआ/पथ/९५९,दि.२६/१२/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्र. १४७९**

वॉर्ड क्र.१३४ धनकवडी गावामधील स.नं. २,३३,३५ व ३७ येथे विविध ठिकाणच्या गल्लीबोळ व रस्त्यांवर इंटरलॉकींग ब्लॉक्स व चेकर्स फरशी बसविणेकरिता र.रु.२२.५० लाखाचे वर्गीकरणाबाबत मा. भिमराव तापकिर व मा. सौ. स्वाती मोरे व मा. संतोष फरांदे यांचे दि.३१/१०/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठ.क्र.१०३५, दि.७/११/२००७ ला अनुसरुन मा. अति. महा. आयुक्त (वि) यांनी पत्र क्र.मआ/पथ/९६०,दि.२६/१२/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्र. १४८०**

पुणे मनपाच्या सर्व भाजी मंडईचे दैनंदिन साफ सफाईचे कामाबाबत मा. दिपक बोडके व मा. विनोद ओरसे यांचे दि.२५/७/२००७ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठ.क्र.५३५, दि.३१/७/२००७ ला अनुसरुन मा.महा. आयुक्त यांनी पत्र क्र. मआ/उआ(मंडई)/९६६, दि.२८/१२/२००७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

<u>**सर्वात कमी रकमेचे टेंडर्स**</u>

**विषय क्रं. १४८१**

पौड रोड-पौड फाटा ते चांदणी चौक व डेक्कन कॉलेज ते बॉम्बे सॅपर्स या रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण व डांबरीकरण करणे व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.एम.बी.पाटील कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६३,२७,२२,०६३/- पेक्षा ७.९०% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ६८,२७,०७,१०५=९८ पर्यंत अधिक डांबर,स्टील, सिमेंटसाठी बाजारभावानुसार फरक व उर्वरित माल मटेरीयलसाठी भाववाढ सुत्रानुसार काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/जनेयो/९४० दि. २४/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १४८२**

विश्रांतवाडी ते धानोरी या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.वालेचा इंजिनियरिंग लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३९,९२,९५,३३९/- पेक्षा ७.२% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ४२,८०,४४,६०३=४१ पर्यंत अधिक डांबर,स्टील, सिमेंटसाठी बाजारभावानुसार फरक व उर्वरित माल मटेरीयलसाठी भाववाढ सुत्रानुसार काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/जनेयो/९४१ दि. २४/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १४८३**

वडगाव जलशुद्धीकरण केंद्राकरीता आर.सी.सी. सिमाभिंत बांधणे (भाग-२) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.संदिप जागडे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १९,१७,७७८/- पेक्षा १५.३०% कमी) असल्याने त्यांचे कडून र.रुपये १६,२४,३५७=९७ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु/प्र/९४४ दि. २६/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १४८४**

खराडी स.नं.३७/१/ब येथील सुंदराबाई मराठे विद्यालयाजवळील १६ लाख लिटर्स क्षमतेच्या ई.एस.आर. टाकीच्या जागेस संरक्षक सिमाभिंत व वॉचमन क्वार्टर बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.ॲटकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २४, ३८,९५७/- पेक्षा १९.२७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १९,६८,९६९=९९ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु/प्र/९४५ दि. २६/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १४८५**

आंबेडकरनगर झोपडपट्टी अंतर्गत पाण्याची लाईन टाकणे(भाग-१) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.श्रीस्वामी गोविंदा कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९,९९,८२६/- पेक्षा ३०.% जास्त) असल्याने त्यांचेकडून त्यांचे टेंडर दरानुसार उपलब्ध तरतुद र.रुपये १०,००,०००/- पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु/९४६, दि. २६/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १४८६**

आंबेडकरनगर झोपडपट्टी अंतर्गत पाण्याची लाईन टाकणे(भाग-२) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.श्रीस्वामी गोविंदा कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९,९९,८२६/- पेक्षा २९.% जास्त) असल्याने त्यांचेकडून त्यांचे टेंडर दरानुसार उपलब्ध तरतुद र.रुपये १०,००,०००/- पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु/९४७, दि. २६/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्र.१४८७**

वॉर्ड क्र. ११८, आंबेडकर नगरमध्ये पाण्याची लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.श्रीस्वामी गोविंदा कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१४,९९,६८८ /- पेक्षा ३४% जास्त) असल्याने त्यांचेकडून त्यांचे टेंडरदरानुसार उपलब्ध र.रुपये १५,००,०००/- पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ /पापु/९४८,दि. २६/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १४८८**

पुणे शिवाजी स्टेडियम येथील विविध विकासाची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.डी.एस.चौधरी कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २३,७४,८२० =२५/- पेक्षा ९% जास्त)(तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २५,८८,५५४=०७ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/भवन ९४९, दि. २६/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १४८९**

वॉर्ड क्रं. ५४ मधील महालेनगर व वडारवाडी परिसरातील रस्ते सेन्सर पेव्हरने डांबरीकरण करणे या कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.सनशाईन पेव्हिंग्ज प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १०,९९,४०३/- पेक्षा २६.७९% जास्त)(१०% जास्त तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १२,०९,३४३=३० पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उआ(क्रं.१) घोलेरोड/९४३ दि. २६/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १४९०**

वॉर्ड क्र. २२, मुळा रोड येथे सुलभ शौचालय बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बसवंते पांडूरंग मरिबा यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १२,५५,९६२ /- पेक्षा २% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १२,८१,०८१=२४ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/उअ(क्र.३)गवनि/९७०, दि. २९/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १४९१**

रामटेकडी स.नं. १०८/१०१, आनंदनगर येथे जुने शौचालय पाडून नविन बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आंकाशा असोसिएटस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१७,९९,८३७=६०/-ॲटपार (तडजोड दराने)असल्याने त्यांचेकडून र.रू.१७,९९,८३७=६० पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/उअ(क्र.३)गवनि/९७१, दि. २९/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १४९२**

वारजे फ्लाय ओव्हरचे खाली मोकळया जागेस डबर बाधकामासह चेनलिंक फेन्सिंग करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १३ टेंडसपैकी ठेकेदार मे.टी.एल.मते यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १५,८४,८७३/- पेक्षा १८.०७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १२,९८,४८६=४५ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उद्यान/९७३ दि. २९/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १४९३**

वॉर्ड क्रं. ७ लोहगाव परिसरातील नाला चॅनेलायझेशन करणे व मुख्य रस्त्यावर स्टॉर्म वॉटर लाईन टकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.सिध्दीविनायक एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १९,९९,१९९/- पेक्षा १०.% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १७.९९२७९=१० पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/९७४ दि. २९/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १४९४**

कळस स्माशानभुमी येथे विविध सुधारणा कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार मे.प्रशांत कन्स्ट्रक्शन्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर रक्कम रुपये . १५,८७,८५३/- ॲटपार दराने ) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १५,८७,८५३/- पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/भवन/९७५ दि. २९/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १४९५**

वॉर्ड क्रं, १३५ गणेश नगर. कुंदननगर, मुंगळे अण्णा नगर. उर्मिला सोसायटी, चैतन्य नगर या परिसरातील पी,व्ही.सी. लाईन काढून सी.आय. लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार श्री. व्ही.एस. निंबाळकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर रक्कम रुपये . १६,९८,८४३/- पेक्षा १२.५१ % जास्त ) असल्याने त्यांचेकडून टेडंर दरानुसार उपलब्ध र.रुपये १७,००,०००/- पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु/९७६ दि. २९/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १४९६**

रेल्वे क्रॉसिंग ते म्हसोबा मंदिर येथे रस्त्याचे उजव्या बाजूने ८ इंच व्यासाची पाण्याची लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार प्रतिक कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९,४९,९७०/- पेक्षा १४.९९% जास्त) असल्याने त्यांचेकडून त्यांनी सादर केलेल्या दरानुसार र.रुपये १०,९२,३७०,५०/- पर्यंत (उपलब्ध रकमेपर्यत )काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि)यांचे क्र.मआ/पापु/९७७दि. २९/१२/०७ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्रं. १४९७**

पुणे शहर व परिसर तसेच पिंपरी - चिंचवड महानगरपालिका परिसर यांच्या सभोवताली आखण्यात आलेल्या ९० मी. रूंद रस्त्यापैकी पुणे महानगरपालिका व लगतच्या परिसरातील रस्त्याअंतर्गत जागेचे भूसंपादन पुणे महानगरपालिकेच्या खर्चाने सुरू करण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे मआ/नअ/२६१,दि. १७/७/०७ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार एक महिन्यानी करावा असे दि. ४/१२/०७ च्या सभेत ठरले होते. )

**विषय क्र. १४९८**

गुलटेकडी येथे ‘‘ बाग-ए-रहमत कब्रस्तान’’ येथे विविध कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.रोहित कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १६,९५,९२४/- पेक्षा १९.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १३,५६,९०८=७९ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/भवन ९१७, दि. १९/१२/२००७ चे पत्र.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २८/१२/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४९९**

पुणे मनपाकडील ज्युनिअर ग्रेड लेखनिक या कामासाठी करार पध्दतीने ६ महिने मुदतीसाठी सेवा घेणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/सहआ/से/७६५ दि. २१/११/२००७ चे पत्र.
(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २८/१२/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५००**

श्री.हरुण गफुर सय्यद, मोटार सारथी, व्हेईकल डेपो यांना मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ५६(२)(ग) नुसार मनपा सेवेतुन काढ्न टाकण्यास **(Removal from Municipal Service)** मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/सहमआ/से/७८६ दि. २८/११/२००७ चे पत्र.
(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २८/१२/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५०१**

बाजारभावाप्रमाणे डी.आय. व सी.आय. पाईपचे दरातील फरक ठेकेदारांस अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्रं. मआ/पा.पु./८८५ दि. १४/१२/२००७ चे पत्र.
(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २८/१२/२००७ च्या सभेत ठरले)

**विषय क्र.१५०२**

पुणे महानगरपालिकेच्या वेगवेगळ्या उद्यानामध्ये कार्यक्रमास/उपक्रमास परवानगी देणेस मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका.आयुक्त यांचे जा. क्र. मआ/उद्यान/९०७, दि. १८/१२/२००७ चे पत्र.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २८/१२/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १५०३**

पुणे महानगरपालिका जेएनएनयुआरएम प्रकल्पाअंतर्गत मुळा मुठा नदी पात्रातील संगमपुल ते बंडगार्डन बंधारा यामधील गाळ राडारोडा काढण्याचे काम पाटबंधारे विभागाच्या मशिनरीच्या साह्याने करणेसाठी व त्यास लागणा-या इंधन, वंगण व इतर खर्चापोटी र.रू.२१५ लक्ष रूपयांच्या अंदाजपत्रकाच्या खर्चास मान्यता देणेस व र.रू.१५० लक्ष आगाऊ उचल धनादेश देण्यासाठी तसेच उरलेली रक्कम टप्याटप्याने उपलब्ध करून देणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे मआ/भवन/९२५,दि. २०/१२/२००७ चे पत्र.

(सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २८/१२/२००७ च्या सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्र. १५०४**

अंदाजपत्रकातील मान्य तरतूदीमधून रक्कम रू.३०,०००/-चे वर्गीकरण १. मुख्य देखरेख वसुली वगैरे क. मनपा नि स्थायी समिती १. नगरसचिव यांचे कार्यालय सन २००७-०८ २८ मनपा विस्तारीत कक्ष इमारतीतील नगरसचिव कार्यालयात फर्निचर व इतर सुविधा करणे RE 11 A 128 याखात्यातून मुख्य देखरेख वसुली वगैरे, क. म.न.पा. नि स्थायी समिती, १-नगरसचिव यांचे कार्यालय ४१. महर्षी वाल्मिकी पुरस्कार देणेसाठी RE 11 A 141 या खात्याकडे वर्गकरण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे मआ/मुले/९५२, २६/१२/२००७ चे पत्र

**विषय क्रं. १५०५**

अंदाजपत्रकातील मान्य तरतूदीमधून रक्कम रू.५०,००,०००/- चे वर्गीकरण विकास अभियंता(सु.ऑ.) भवन रचना कार्यालय सन ०७-०८ भांडवली कामे CE 11 A 118 १ मुख्य देखरेख वसुली वगैरे, जकातनाक्यामध्ये रस्ते कॉंक्रिट करणे व विविध सुधारणा कामे करणे या खात्यातून विकास अभियंता (सु.ऑ.) भवन रचना कार्यालय सन ०७-०८ भांडवली कामे CE 28 A 173 १८ सांस्कृतिक केंद्र, ३६.वानवडी येथे म.फुले सांस्कृतिक भवन बांधणे या खात्याकडे करण्यास स्थायी समिती मार्फत मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे मआ/भवन/९५५, दि. २६/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्र. १५०६**

अंदाजपत्रकातील मान्य तरतूदीमधून रक्कम रू.५०,००,०००/- चे वर्गीकरण विकास अभियंता(सु.ऑ.) भवन रचना कार्यालय सन ०७-०८ भांडवली कामे CE 24A 117 १४ अग्निशामक केंद्र खराडी, विश्रांतवाडी, कोंढवा, हडपसर, वारजे, बाणेर, कोथरूड, डेपो व बिबवेवाडी याठिकाणी अग्निशामक केंद्र उभारणे दोन गाड्यांसाठी या खात्याकडून विकास अभियंता (सु.ऑ.) भवन रचना कार्यालय सन ०७-०८ भांडवली कामे CE 17 A 123 ७ रूग्णालये, प्र.गृहे व औषधालये, कमला नेहरू रूग्णालय येथे हॉस्पिटल करिता नवीन इमारत बांधणे या खात्याकडे करण्यास स्थायी समिती मार्फत मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज.) यांचे मआ/भवन/९५७, दि. २६/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्र. १५०७**

पुणे महानगरपालिकेच्या आर्किटेक्टस पॅनेलवर मे. नियोजन कन्सल्टंस आर्किटेक्टस ॲण्ड प्लॅनर्स यांची नेमणूक करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/भवन/९५०, दि. २६/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्र. १५०८**

शिक्षण मंडळातील बालवाडीतील मुलांना मिड डे मिल पुरविणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे क्र. मआ/नावियो/९५१, दि. २६/१२/२००७ चे पत्र.

१) पुणे मनपा शिक्षण मंडळातील सध्या सुरू असलेल्या ३०० बालवाडीतील मुलांना तसेच भविष्यात वाढणाऱ्या बालवाडीतील मुलांनाही मिड डे मिल अंतर्गत विविध पौष्टीक आहार तज्ञांचे सल्ल्यांनुसार दररोज देणेस

२) सदर मिड डे मिलचा पुरवठा नागरवस्ती विकास योजना पुरस्कृत महिला बचत गटांमार्फत दरपत्रक मागवून करणेस व एका मुलामागे जास्तीत जास्त रू.४/- दरडोई दररोज पर्यंत खर्च करणेस अथवा वेळोवेळी येणाऱ्या दराप्रमाणे करणेस

३) सदर मिड डे मिलसाठी येणारा खर्च नागरवस्ती विकास योजना खात्याकडे महिला बाल कल्याण योजनेअंतर्गत उपलब्ध होणाऱ्या तरतुदीतून करणेस

**विषय क्र. १५०९**

६ वे पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल २००८ दिनांक १० ते १७ जानेवारी २००८ दरम्यान पुणे शहरात आयोजित करणेत आलेले असून सदर कार्यक्रमाचे आयोजनासाठी खालील बजेटहेडमधून रक्कम रूपये २०,००,०००/- (रुपये वीस लाख फक्त) उपलब्ध करून संबंधितांस देणेस मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे नसजा/५७७३, दि. २७/१२/२००७ चे पत्र.

सन २००७-०८ चे अंदाजपत्रक १. मुख्य देखरेख वसुली वगैरे क. मनपा नि स्थायी समिती १. नगरसचिव यांचे कार्यालय ४५. पुणे शहरात प्रथमच होणाऱ्या आंतराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हलसाठी पुणे मनपातर्फे खर्च करणे, तरतूद रक्कम रूपये २०,००,०००/-.

**विषय क्र. १५१०**

मलनि:सारण प्रकल्प विभागामार्फत नवीन पंपिंग स्टेशन, मैलापाणी शुद्धीकरण केंद्र उभारणे, शुद्धीकरण केंद्राचे विस्तारीकरण करणे व तदनुषंगिक कामे करण्यासाठीतज्ञ सल्लागाराची (पॅनेल) यादीस मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र. मआ/मलनि/प्र/९६५, दि. २८/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्र. १५११**

पुणे महानगरपालिका व डेक्कन कॉलेज यांचे संयुक्त विद्यामाने हेरिटेज पार्क विकसित करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे क्र. मआ/नअ/९६८,दि. २८/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्र. १५१२**

जे.के. टायर ॲन्ड इंडस्ट्रीज लि., २०१ गेरा चेंबर्स, बोट क्लब रोड, पुणे-४११ ००१ यांचे आयातकराचे चालू खाते (करंट अकौंट) सुरू करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे क्र. मआ/आयातकर/९६९,दि. २९/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्र. १५१३**

स्थायी समिती सभा प्रसंगी चहापान व खाद्यपदार्थ मागविण्यात आले असून संबंधितास बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.नगसचिव यांचे क्र.५७२९, दि. २९/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्र. १५१४**
मा. ॲड्. प्रसन्न जगताप, मा. शंकरराव बेलदरे पाटील यांचे दि. २९/१२/२००७ चे पत्र.

पुणे महानगरपालिका हद्दीतील गुंठेवारी करण्यासाठीची मुदत संपलेली आहे. तरी आर्थिक वर्षे मार्च ते मार्च असते. त्यामुळे मार्च २००८ पर्यत गुंठेवारी करण्यास मुदतवाढ देण्यात यावी. त्यामुळे पुणे महानगरपालिकेस आर्थिक फायदा होईल.

आत्ता पर्यंत गुंठेवारी प्रकरणातुन पुणे मनपास अंदाजे ५० कोटींचे उत्पन्न प्राप्त झाले आहे.

**विषय क्रं. १५१५**

आरक्षित मिळकतीचे तडजोडीने ताबे घेणे कामी खाजगी संस्थेची नेमणूक व जागेच्या मोबदल्यात रेडिरेकनर दराच्या १५४% पर्यत नुकसान भरपाई अदा करणेबाबतचे मा. महापालिका आयुक्त यांचे क्रं. मआ/भूसंपादन/९७२,दि. २९/१२/०७ चे पत्र.

**विषय क्रं. १५१६**

दि. १०/१२/०७ ते १६/१२/०७ अखेर पुणे मनपाच्या हद्यीत लागलेल्या एकूण १७ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी क्रं. मआ/अशाद/९७८,दि. २९/१२/०७ ने पाठविलेला आगींचा साप्ताहिक अहवाल माहितीसाठी.

**विषय क्रं. १५१७**

बाणेर एन.सी.एल.ते सोमेश्वरवाडी रस्ता पेव्हरने डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार श्री.टी.जी.दमानी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९,९८,९००/- पेक्षा १८.९०% जास्त,तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ११,८७,६९२=१० पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/उआ(क्र.१) औंध/९६४ दि. २७/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्र. १५१८**

स.नं. ८९/अ, हिंगणेमळा रोड, समर्थनगर, हडपसर, पुणे १३ ते स.नं. ८८/१ ते ५ पर्यंत विविध ठिकाणी पाण्याची लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार मे.एस.बी.माने यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २९,९९,९५०/- पेक्षा १०.७०% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३३,२०,९४४=६५ पर्यंत (उपलब्ध रकमेपर्यंत) काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु/९७९, दि. ३१/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्र. १५१९**

वॉर्ड क्र. ९६ महंमदवाडी, इशरतबाग, न्याती इस्टेट परिसरात ४ इंच व्यासाची पाण्याची लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार मे.एस.बी.माने यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९,९९,७५०/- पेक्षा ११.४२% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ११,१३,९२१=४५ पर्यंत (उपलब्ध रकमेपर्यंत) काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु/९८०, दि. ३१/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्र. १५२०**

पुणे महानगरपालिका मलनि:सारण प्रकल्पांतील भैरोबा नाल्यामध्ये मुख्य मलवाहिनी टाकणे (सन २००७-०८) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडसपैकी ठेकेदार मे.आर.बी.कृष्णानी यांचे टेंडर सर्वांत कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १०,६१,१९,३०७=४० पेक्षा १३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ९,२३,२३,७९७=४४ अधिक भाववाढ सुत्रानुसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मलनि/प्र/९८१ दि. ३१/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १५२१**

कर्वे रस्त्यावरील नाईक पुलाचे रूंदीकरणामध्ये येणा-या १६'' व १०'' पाण्याच्या लाईन शिफ्ट करणे कामी ठेकेदार मे.पी.एम.कुदळे ॲन्ड असोसिएसटस यांचे एकच टेंडर्स आले ( टेंडर र.रु.१३,४८,२८५/- पेक्षा ६.०५७% जास्त ) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १४,२९,९५०=६२ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु/९८२ दि. ३१/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १५२२**

पुणे सोलापूर रस्त्याने डाव्या बाजूनस पुणे पेठ वानवडी स.नं.४०,४१ येथील एस.आर.पी.एफ.कॅम्पसच्या बांधकामामध्ये येणारी बेकर्स हिल टाकी ते हडपसर प्रिस्ट्रेस्ड नलिका कडेने हटविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.पी.एम.कुदळे ॲन्ड असोसिएसटस् यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रु.१४,४९,९१९/- पेक्षा १९.१७% जास्त असल्याने त्यांचेकडून र.रुपये १७,२७,८६८=४७ पर्यंत (उपलब्ध रकमेपर्यंत) पर्यत काम करून घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/पापु/९८३ दि. ३१/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १५२३**

Supply of one Central Cisco Routers & required Converter to Pune Municipal Corporation टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार टुलिप आयटी सर्व्हिसेस यांनी दिलेला दर सर्वात कमी असल्याने त्यांच्याकडून काम करून घेण्यास व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/मुले/९८४ दि. ३१/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १५२४**

हॉटेल ग्रीन पार्क ते बालेवाडी स्टेडियम क्रॉसिंग वेस्टरली बायपास या रस्त्याचे काँक्रीटीकरण, डांबरीकरण व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.ॲटलांटा यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रु.५५,६९,२९,०५४/- पेक्षा १३.१०% जास्त ) त्यांचेकडून र.रुपये ६२,९८,८६,७६०=०७ पर्यंत अधिक डांबर, स्टील, सिमेंटसाठी बाजारभावानुसार फरक व उर्वरीत माल मटेरीयलसाठी भाववाढ सुत्रानुसार फरक आदा करणेस व त्यांचेशी काम करून घेण्यासाठी करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/जनेयो/९८५ दि. ३१/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १५२५**

अंदाजपत्रकातून मान्य तरतुदीतून र.रू.१८ लाखाचे विकास अभियंता (सु.आ) भवन रचना कार्यालय सन २००७-०८ भांडवली कामे ce22a581/s26-29 १२ भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था आचार्य अत्रे प्रतिष्ठान विविध कामे करणे या खात्यातून विकास अभियंता (सु.आ) भवन रचना कार्यालय सन ०७-०८ भांडवली कामे नवीन
२ प्राथमिक शिक्षण वॉ.क्र.११० मनपा. शा.क्र.१६१ बी मधील दिगंबरवाडी मनपा शाळेत वर्गखोल्या बांधणे.या खात्याकडे करण्यास स्थायी समिती मार्फत मुख्यसभेची मान्यता मिळणेबाबत. मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र.मआ/भवन/९८६ दि. ३१/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १५२६**

येरवडा ते डेक्कन कॉलेज,२ पुणे स्टेशन ते फिझरगल्ड ब्रिज ( बंडगार्डन चौक) ॲप्रोच रस्ता ते संगमवाडी ब्रिज ( नदीपासून संगमवाडी पुलापर्यंत) या रस्त्याचे डांबीरकरण करणे व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.पाटील कन्सट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रु.२३,६४,७३,९२१/- पेक्षा १३.९% जास्त ) र.रुपये २६,९३,४३,७९६=०२ पर्यंत अधिक डांबर, स्टील, सिमेंटसाठी बाजारभावानुसार फरक व उर्वरीत माल मटेरीयलसाठी भाववाढ सुत्रानुसार फरक आदा करणेस व त्यांचेकडून काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/जनेयो/९८७ दि. ३१/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १५२७**

बाजीराव रोड, नेहरू रोड, शिवाजी रोड, सणस ग्राऊंड सराऊंडिंग रोड, कामगार पुतळा ते शिवाजी पुतळा , हिराबाग ते दांडेकर पूल, फर्ग्युसन कॉलेज रोड, एस.पी.कॉलेज ते पेशवे पार्क या रस्त्यांचे डांबरीकरण करणे व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.पाटील कन्सट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रु.६२,०५,०४,१२६/- पेक्षा १४.९०% जास्त ) र.रुपये ७१,२९,५९,२४०=७७ पर्यंत अधिक डांबर, स्टील, सिमेंटसाठी बाजारभावानुसार फरक व उर्वरीत माल मटेरीयलसाठी भाववाढ सुत्रानुसार फरक आदा करणेस व त्यांचेकडून काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/जनेयो/९८८ दि. ३१/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १५२८**

पुणे मुंबई रस्ता संगम पूल ते मनपा हद्द उर्वरित रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे या कामाचे ठेकेदार मे.ए.पी.आय.कन्सट्रक्शन यांचेकडून मूळ टेंडर रक्कम रूपये १,९९,५८,५९० = ७२ अधिक टेंडर दर ९.९९% जादा दराने वाढीव काम रक्कम रूपये ३,३५,४२७ = ५७ अशी एकूण रक्कम रूपये २,०२,९४,०१८ = २९ पर्यंत काम करून घेणेस अधिक डांबर, सिमेंट व स्टील यांचा दरातील बाजारभावातील फरक ( वाढ /कपात) ठेकेदारास आदा करणेस व त्यांचेबरोबर दुरूस्त करारनामा करणेस मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे क्र.मआ/जनेयो/९८९ दि. ३१/१२/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. १५२९**

मा.शिवराम मेंगडे यांचे दि. ३१/१२/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ११२, स.नं.२० कर्वेनगर मधील महिला बचत गटाने तयार केलेल्या विविध वस्तूचे विक्री केंद्र बांधणेकरिता र.रुपये ६ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००७-०८ चे अंदाजपत्रक, ५ लोकारोग्य (पान क्र.१३६ अ.क्र.३८) नव्याने समाविष्ठ झालेल्या ३८ गावातील स्मशानभूमीत सुधारणा कामे करणे ( मान्य तरतूद २ कोटी) दोन कोटी | ६ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉ.क्र.११२ स.नं.२० कर्वेनगर येथील महिला बचत गटाने तयार केलेल्या विविध वस्तूंचे विक्री केंद्र बांधणे. | --- | ६ लाख |

## दाखल विषय

**विषय क्रं. १५३०**

मा.महादेव बाबर, मा.संदिप लडकत, मा.राजेंद्र काची, मा.आबा बागुल व मा.सौ.ज्योत्स्ना सरदेशपांडे यांचे दि. ४/१/२००८ चे पत्र.

श्री.आनंद बोराडे हा एक होतकरु नेमबाज असून त्याने आत्तापर्यंत विद्यापीठ, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर नेमबाजीवर लक्षवेधी कामगिरी केलेली आहे. परंतु पुढील राष्ट्रीय पातळीवर नेमबाजी स्पर्धेत भाग घेण्यासाठी त्याच्याकडे रायफल घेण्यासाठी आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे स्पर्धेत भाग घेण्यासाठी अडचण निर्माण होत आहे.

तरी त्याच्या परिस्थितीचा विचार करुन पुणे मनपातर्फे र.रुपये १,२५,०००/- चे अर्थसहाय्य रायफल घेण्यासाठी करण्यात यावे, ही विनंती.

**विषय क्रं. १५३१**

मा.संदिप लडकत, मा.शाम देशपांडे, मा.महादेव बाबर, मा.अरुण धिमधिमे, मा.श्रीकांत पाटील, मा.राजेंद्र काची, मा.सुनिल कांबळे, मा.सुनिल बनकर व मा.दिलीप उंबरकर यांचे दि. ३/१/२००८ चे पत्र.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांनी देशातील महिलांसाठी पहिली शाळा बुधवार पेठेतील भिडे वाड्यात सुरु केली. आपल्या देशाच्या अंगणवाडी ते अग्निबाणापर्यंतच्या प्रगतीमध्ये जो महिलांना सहभाग देता आला त्याचे मुळ केंद्र हा भिडे वाडाच आहे. म्हणून अशी ही ऐतिहासिक वास्तु महापालिकेने विकत घेऊन अथवा योग्य त्या पध्दतीने महापालिकेच्या ताब्यात घेऊन त्याठिकाणी राष्ट्रीय स्मारक करणेस व त्यासाठी राज्य व केंद्र सरकारची आवश्यकता असल्यास मदत घ्यावी अशा प्रकारचा मनपा मुख्य सभा ठराव क्र. ५५७ दि. २१/२/२००६ ने मान्य झालेला आहे.

परंतु याबाबत आर्थिक तरतुद न केल्याने सदरील काम अपुर्ण आहे. तरी भिडे वाडा ताब्यात घेण्यासाठी व तेथे राष्ट्रीय स्मारक करण्यासाठी सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पात रक्कम रुपये ३ कोटींची तरतुद करण्यात यावी तसेच भूसंपादनाची कार्यवाही करण्यात यावी.

**विषय क्रं. १५३२**

१) एअरपोर्ट रोड जंक्शन ते विश्रांतवाडी चौक २) पुणे स्टेशन ते एम.जी.रोड (साधु वासवानी चौक मार्गे), गोळीबार जंक्शन ते सेव्हन लव्हज फ्लाय ओव्हर शंकरशेठ जंक्शन ते नेहरु स्टेडियम ३) कल्याणीनगर जंक्शन ते आळंदी रोड, ४) पुणे स्टेशन ते आर.टी.ओ.जंक्शन या रस्त्याच्या डांबरीकरण करणे व तद्नुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.पाटील कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५५,१०,६५,१८०/- पेक्षा ९.९०% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ६०,५६,२०,६३२=८२ अधिक डांबर, स्टील, सिमेंटसाठी बाजारभावानुसार फरक व उर्वरित माल मटेरियलसाठी भाववाढ सुत्रानुसार फरक आदा करणेस व काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/जनेराशपुअ/९९१ दि. १/१/२००८ चे पत्र.

**विषय क्रं. १५३३**

मा.दिलिप उंबरकर, मा.सौ.ज्योत्स्ना सरदेशपांडे यांचे दि. ४/१/२००८ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. १३५९ दि. १४/१२/२००७ चा फेरविचार करण्यात यावा. (झोपडपट्टी पुर्नवसन प्रकल्पातील झोपडपट्टयांमधील पात्र झोपडीधारकांना प्रकल्प महत्व सांगणे. सेवाशुल्क वसुली. जातीचे दाखले गोळा करणे. सोसायटया करणे. फोटो अंगठे डिजिट लाईज करणे. बायोमेटोक सर्व्हे कार्ड देणे. बँक प्रपोजल करणे. पुर्नवसन झाल्यावर सोसायटीचे कामकाज सुरळीत करून देणे या कामाची निविदा मान्यतेबाबत)

**शरद समेळ,**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**